# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 23/03/2021 (मंगळवार)

(सायंकाळ)

---

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत शनीमंदीर समोर शितलवाडी रामटेक येथे दिनांक 22/03/2021 चे 19:25 वा. ते 19.30 वा. दरम्यान उदाराम शिवराम उके वय 53 वर्ष रा. नगरधन हे त्यांच्या मोटरसायकलने कांद्री माईन येथुन डयुटीवरुन मौदा रोडने नगरधन येथे जात होते. त्यादरम्यान समोरुन जात असलेल्या बैल बंडी चालक आरोपीने अचानकपणे बैलबंडी थांबवील्याने तो आपल्या मोटारसायकलने बैल बंडीला धडकला. या अपघातात उदाराम उके यांच्या छातीला मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यु झाला. तसेच बैल बंडी चालक हा घटनास्थळावरून पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– निखील उदाराम उईके वय 21 वर्ष रा. नगरधन यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री शेंडगे 9011253003 हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 06 कि. मी. मौजा कोर्थुणा येथे दिनांक 22/03/2021 चे 11.00 वा. पुर्वी मृतक नामे– रामेश्वर डोमाजी चौधरी वय 45 वर्ष रा. कोर्थुणा हा वेडसर पणाचे भरात विहीरीत कुदून पाण्यात बुडुन आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– पुंडलीक डोमाजी चौधरी वय 36 वर्ष, रा. कोर्थुणा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा गंगाधर ठाकरे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर